महाळुंगे M.I.D.C. पोलीस स्टेशन
पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालय
पत्ता- एम.आय.डी.सी.चौक, चाकण-तळेगाव दाभाडे रोड,
महाळुंगे (इंगळे), ता-खेड, जि-पुणे 410501
मेल आय.डी. pimahalunge.pcpc-mh@gov.in
संपर्क क्रमांक – 7028535323

# प्रेस नोट दिनांक १७/०३/२०२४

**महाळुंगे एमआयडीसी पोलीस स्टेशन तपास पथकाची धडाकेबाज कामगिरी :- देशी बनावटीचे पिस्तल व पाच जिवंत काडतुसासह एका इसमास महाळुंगे एमआयडीसी पोलीसांकडून अटक**

-------------------------------------ooooo---------------------------------------------

**मा. पोलीस आयुक्त सो, पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालय यांनी पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालय हद्दीमध्ये लोकसभा निवडणुक २०२४ च्या अनुषंगाने अवैध्द रित्या शस्त्र बाळगणा-या गुन्हेगारांवर कारवाई करणेकामी सुचना व मार्गदर्शन केले होते. त्यानुसार श्री नितिन गिते, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, महाळुंगे एमआयडीसी पोलीस स्टेशन यांचे मार्गदर्शनाखाली कारवाई करत असताना दिनांक १६/०३/२०२४ रोजी १५/३० वाजणेचे सुमारास पोलीस अंमलदार अमोल माटे यांना त्यांचे गुप्त बातमीदारा मार्फत बातमी मिळाली मौजे महाळुंगे ता खेड जि पुणे गावच्या हद्दीत महाळुंगे ते आंबेठाण रोडलगत, व्दारका सिटी समोर, रॉयल चिकन सेंटर जवळ एक इसम स्वत:चे कब्जात पिस्तुल सारखे हत्यार बाळगुन संशयितरित्या वावरत आहे. अशी खात्रीलायक बातमी मिळाल्याने सदरची बातमी श्री कल्याण घाडगे, तपास पथक प्रभारी अधिकारी, महाळुंगे एमआयडीसी पोलीस स्टेशन यांना कळविल्याने त्यांनी लागलीच सदरची बातमी हि श्री नितिन गिते वरीष्ठ पोलीस निरीक्षक यांना सांगितल्याने त्यांनी बातमीच्या अनुषंगाने खात्री करुन कायदेशिर कारवाई करण्याचे आदेश दिल्याने सपोनि घाडगे व तपास पथकातील अंमलदार असे बातमीच्या अनुषंगाने व्दारका सिटी समोर, रॉयल चिकन सेंटर जवळ संशयितरित्या थांबलेल्या इसमास ताब्यात घेतले असता त्याचे नाव सोनु नकीक अहमद, वय ३१ वर्षे, रा. सध्याचा पत्ता - प्रविण बेंडभर यांचे रुममध्ये भाडयाने, महाळुंगे गाव ग्रामपंचायत शेजारी, मौजे महाळुंगे इंगळे ता. खेड जि. पुणे मुळगाव - बहादुरपुर कच्छा, फुलपुर, प्रयागराज, उत्तरप्रदेश असे सांगितले त्यावेळी त्याची पंचासमक्ष अंगझडती घेतली असता त्याचेकडे ३२,५००/- एकुण रुपये किंमतीचे एक देशी बनावटीचे पिस्टल व पाच जिवंत काडतुसे मिळुन आले असुन सदर इसमाविरुध्द महाळुंगे एमआयडीसी पोलीस स्टेशन गु.र.नं. १४९/२०२४ शस्त्र अधिनियम १९५९ कलम ३ (२५), सह महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ चे कलम ३७ (१) / १३५ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.**

सदरची कारवाई मा.पोलीस आयुक्त **श्री.विनयकुमार चौबे सो,** मा.अपर पोलीस आयुक्त **श्री.वसंत परदेशी सो,** मा.पोलीस उप-आयुक्त,परिमंडळ ३, **श्री शिवाजी पवार सो,** मा.सहाय्यक पोलीस आयुक्त,चाकण विभाग, **श्री राजेंद्रसिंग गौर** सो, यांचे सुचना व मार्गदर्शना खाली **वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री नितिन गिते,पोलीस निरीक्षक गुन्हे** श्री.संतोष कसबे, **सहा.पोलीस निरीक्षक**, श्री.कल्याण घाडगे, **पोहवा** राजु राठोड राजेंद्र कोणकेरी, अमोल बोराटे, युवराज बिराजदार, विठ्ठल वडेकर, प्रकाश चाफळे, राजु जाधव **पोना** संतोष काळे, **पोना** सांगळे **पोकॉ/** शिवाजी लोखंडे, राजेंद्र खेडकर, गणेश गायकवाड, अमोल माटे संतोष वायकर, मंगेश कदम यांनी केली आहे.

( नितिन गिते )
वरीष्ठ पोलीस निरीक्षक
महाळुंगे एमआयडीसी पोलीस स्टेशन